शाळांचे मूल्यांकन व प्रमाणिकरण करण्यासंदर्भात राज्य स्तरावर सल्लागार समिती गठित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय, क्रमांक- माशाअ-२००९/(२५१ /०९)/माशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २७ मे ,२००९.

**शासन निर्णय :-**

भारत सरकारने भारतीय उद्योग समूहांसोबत क्वॉलीटी कौन्सिल ऑफ इंडिया या स्वतंत्र प्राधिकरणाची स्थापना केली असून याद्वारे मूल्यांकन करणाऱ्या सर्व प्राधिकरणे व संस्था यांच्या निकषांची तपासणी करण्याकरिता नॅशनल ॲक्रेडीटेशन स्ट्रक्चर निश्चित करण्यात आले आहे. क्वॉलीटी कौन्सिल ऑफ इंडियाकडे राष्ट्रीय गुणवत्तेच्या मोहिमेचे नियंत्रण व अंमलबजावणीव्यतिरिक्त नॅशनल इन्फॉर्मेशन व इन्क्वायरी यांचेदेखील कामकाज प्रभावीपणे कसे होईल ही कामे देण्यात आली आहेत. भारतीय उत्पादने व सेवा यांची गुणवत्ता कशी वाढेल हे क्वॉलीटी कौन्सिल ऑफ इंडियाचे मुख्य उद्दिष्ट आहे व याकरिता क्वॉलीटी कौन्सिल ऑफ इंडियाने गुणवत्ता मोहिम देशामध्ये उभी रहावी याकरिता आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त असलेल्या मूल्यांकन पध्दतीचा स्वीकार करुन या अनुषंगाने योजनाबध्द दिशा देण्याचे काम सुरु केले आहे.

क्वॉलीटी कौन्सिल ऑफ इंडिया हे राष्ट्रीय स्तरावरील सर्वोच्च प्राधिकरण असून पारदर्शी व विश्वासार्ह प्रमाणिकरण पध्दती निर्माण करण्याकरिता जबाबदार आहे.

मूल्यांकन व प्रमाणिकरणाची संकल्पना उच्च शिक्षणामध्ये परिचित झालेली असली तरीदेखील शालेय शिक्षणामध्ये मात्र अद्यापही ही संकल्पना दुर्लक्षित राहिलेली आहे. क्वॉलीटी कौन्सिल ऑफ इंडियातर्फे निर्धारित उद्दीष्टे व शिक्षणातील गुणवत्ता या बाबी विचारात घेता मूल्यांकन व प्रमाणिकरण ही काळाची गरज आहे. उच्च शिक्षणामध्ये विद्यापीठे व महाविद्यालये यांच्या नॅककडून केल्या जाणाऱ्या मूल्यांकन व प्रमाणिकरणाच्या कार्यपध्दतीमुळे विद्यापीठे व महाविद्यालयांच्या शैक्षणिक गुणवत्तेमध्ये बदल होण्यास मदत झालेली आहे. महाराष्ट्रामध्ये आज सर्वाधिक ॲक्रेडीटेड महाविद्यालये आहेत व संपूर्ण देशामध्ये सर्वाधिक ॲक्रेडीटेड महाविद्यालये असणारे राज्य म्हणून महाराष्ट्राचा सार्थ लौकीक आहे.

क्वॉलीटी कौन्सिल ऑफ इंडिया व नॅबेट (नॅशनल ॲक्रेडीटेशन बोर्ड फॉर एज्युकेशन ॲण्ड ट्रेनिंग) यांच्यावतीने गुणवत्तापूर्ण शालेय अधिशासनासाठी अधिमान्यता मानांकने(Accreditation Standards for quality School Governance)निर्धारित करण्यात आलेली आहेत. मूल्यांकन व प्रमाणिकरणाच्या माध्यमातून शाळांना शाळांशी संबंधित सर्व जबाबदाऱ्या व कर्तव्ये पार पाडण्याच्यादृष्टीने सक्षम करण्याकरिता सहकार्य केले जाते. मूल्यांकन व प्रमाणिकरणाचे लक्ष्य विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविणे व पर्यायाने शाळांचा विकास व निरंतर गुणवत्ता विकास हे आहे. देशातील केंद्रीय विद्यालये ही मूल्यांकन व प्रमाणिकरण करुन घेत आहेत. देशातील विविध राज्यांनी नॅबेटतर्फे निर्धारित मूल्यांकन व प्रमाणिकरणाच्या कार्यपध्दतीचा स्वीकार केला आहे व त्यानुसार विविध उपक्रम सुरु केले आहेत.

राज्यात सुरु असलेल्या सीबीएसई, आयसीएसई, आयबी तसेच राज्य मंडळाच्या सर्व शाळा यांनी क्वॉलीटी कौन्सिल ऑफ इडिया व नॅबेटतर्फे सुरु करण्यात आलेल्या या शिक्षणाच्या गुणवत्ता चळवळीमध्ये स्वयंस्फूर्तीने सामिल व्हावे व अधिकाधिक शाळांचे मूल्यांकन व प्रमाणिकरण करुन राज्यात गुणवत्तापूर्ण शालेय शिक्षण व विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकास व्हावा याकरिता धोरणात्मक निर्णय घेण्याच्या उद्देशाने राज्य स्तरावर राज्य सल्लागार समिती गठित करण्यात येत असून सदर समितीची रचना पुढीलप्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| १) | मा.मंत्री (शालेय शिक्षण) | अध्यक्ष |
| २) | मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) | सदस्य |
| ३) | मा. सचिव (शालेय शिक्षण), शा.शि. व क्री.वि.,मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ४) | डॉ.श्री. जगन्नाथ पाटील, नॅकचे डेप्युटी अडव्हायझर | सदस्य |
| ५) | श्री. विलास कुलकर्णी, कार्यकारी संचालक, एज्युकेअर | सदस्य |
| ६) | मा. श्री. विक्रम व. काळे, विधान परिषद सदस्य | सदस्य |
| ७) | शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), म.रा., पुणे | सदस्य |
| ८) | शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| ९) | सीबीएसई/आयसीएसई/आयबी मंडळाचा प्रत्येकी एक प्रतिनिधी | सदस्य |
| १०) | डॉ. सुमन करंदीकर, पुणे- शिक्षण तज्ज्ञ | सदस्य |
| ११) | प्रा. लिलाधर दुलिचंद्र बागडे, गोंदिया-- शिक्षण तज्ज्ञ | सदस्य |
| १२) | श्री. एस.पी.जवळकर, औरंगाबाद- शिक्षण तज्ज्ञ | निमंत्रित |
| १३) | श्री. अ.मा.भट्टलवार, सहसचिव(माध्यमिक), शा.शि. व क्री.वि., मंत्रालय, | सदस्य |
| १४) | श्री. ना.उ.रौराळे,उपसचिव (प्राथमिक),शा.शि. व क्री.वि.,मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| १५) | डॉ. सुवर्णा सि. खरात, अवर सचिव (माशि-१), शा.शि. व क्री.वि., मंत्रालय, मुंबई | सदस्य सचिव |

क्वॉलीटी कौन्सिल ऑफ इंडिया- नॅबेटतर्फे मूल्यांकन व प्रमाणिकरणासंदर्भात सुरु केले जाणारे विविध उपक्रम तसेच राज्यातील शाळांचे मूल्यांकन व प्रमाणिकरण करण्यासंदर्भात सदर समिती धोरण निश्चित करेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in)उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २००९०५७१८२०४३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( डॉ. सुवर्णा सि. खरात )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे.
डॅा.श्री. जगन्नाथ पाटील, नॅकचे डेप्युटी अडव्हायझर
श्री. विलास कुलकर्णी, कार्यकारी संचालक, एज्युकेअर
मा. श्री. विक्रम व. काळे, विधान परिषद सदस्य
सीबीएसई/आयसीएसई/आयबी मंडळाचा प्रत्येकी एक प्रतिनिधी
श्री. एस.पी.जवळकर, औरंगाबाद- शिक्षण तज्ञ
प्रा. लिलाधर दुलिचंद्र बागडे, गोंदिया-- शिक्षण तज्ञ
डॉ. सौ. सुमन करंदीकर, पुणे- शिक्षण तज्ञ
श्री. अ.मा. भट्टलवार, सहसचिव(माध्यमिक), शा.शि. व क्री.वि., मंत्रालय, मुंबई
श्री. ना. उ. रौराळे, उपसचिव (प्राथमिक), शा.शि. व क्री.वि., मंत्रालय, मुंबई
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषदा
सर्व शिक्षण निरीक्षक(पश्चिम/उत्तर/दक्षिण), बृहन्मुंबई
वित्त विभाग, कार्यासन व्यय-६, मंत्रालय, मुंबई
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री (शालेय शिक्षण)यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील कार्यासन अधिकारी-प्राशि-३/उमाशि-१/अर्थसंकल्प/ मा. शि. २
निवड नस्ती माशि-१.